# विद्यार्थी विज्ञान मंथनची राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा संपन्न

भारत सरकारच्या एनसीईआरटी आणि एनसीएसएम यांच्या संयुक्त विद्यमाने, सर्वात मोठी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा म्हणजेच विद्यार्थी विज्ञान मंथन विज्ञान भारतीतर्फे दरवर्षी एका दिवसाच्या नियोजनाची असते. ही परीक्षा प्रथमच परभणीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ आणि परभणी ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी यांच्या सहकायनि दिनांक १६ व १७ डिसेंबरला संपन्न झाली. या परीक्षेसाठी वीस जिल्ह्यातील म्हणजेच मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र प्रांत यातील १३० विद्यार्थ्यांची निवड झाली होती.

निवड झालेल्यांपैकी ११३ विद्यार्थी परिक्षेसाठी हजर होते. विद्यार्थी विज्ञान मंथनची राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा नुकतीच संपन झाली, यासाठी विज्ञान भारती (विभा) विद्यार्थी विज्ञान मंथनचे देवगिरी प्रांत समन्वयक श्रीपाद कुलकर्णी आणि अमोल कुंभलकर तसेच पश्चिम महाराष्ट्र प्रांत समन्वयक मीना माळगावकर, वैशाली कामत, देवगिरी प्रांत संयोजक डॉ. नितीन अधापुरे, महाराष्ट्र प्रांत सचिव डॉ. मानसी माळगावकर, पश्चिम देवगिरी प्रांत कार्यकारिणी सदस्य राहूल पाठक, अनिल संवत्सर, अवधूत देशमुख, त्याचबरोबर विभाचे केंद्रीय कार्यकारीणी सदस्य श्री. श्याम बारडकर हे समन्वयक म्हणून लाभले. पूर्ण लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा पार पाडून निकाल जाहीर करण्यात आला. त्यातून इयत्ता ६ वी ते ११ वी मधून प्रत्येक वर्गातून ३ याप्रमाणे एकूण १८ विद्याव्यांची निवड केली. त्यामध्ये इयत्ता सहावीतून सर्वेश बांडक, आरुष पगार व अथर्व चौबे हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व त्रितीय आले. इयत्ता सातचीतून आयुष पाटील, अन्नाद अहुजा व अमोल पाटील हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व त्रितीय आले. इयत्ता आठवीतून श्रीजित मित्रा, अनुपम नजन व अद्वैत राममोहन हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व त्रितीय आले. इयत्ता नववीतून अमृत वर्षिनी, सिद्धांत कावरे व मानस मगर हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व त्रितीय आले. इयत्ता दहावीतून चार्वी कोठारी, समान पांडे व ओम हरकल हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व त्रितीय आले तर इयत्ता अकरावी मधून रोहन पुणेकर, अर्थव जोगळेकर आणि सर्वेश पाटील यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय च त्रितीय क्रमांक पटकाविले. वा सर्व विद्यार्थ्यांमधून प्रत्येक इयत्तेतून प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पातळी परीक्षेसाठी निवड झाली आहे.

दिनांक १७ डिसेंबर रोजी सकाळी परिक्षेचा उद्घाटन सोहळा पार पडला. या उद्घाटनासाठी अध्यक्ष म्हणून कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय खोडके व प्रमुख पाहुणे म्हणून सहयोगी अधिष्ठाता डॉ. सय्यद इस्माईल हे उपस्थित होते. विशेष निमंत्रित म्हणून जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमप्रकाश यादव, डॉ. पी. आर. पाटील, डॉ. पराग नेमाडे, श्याम बताडकर हे उपस्थित होते. परीक्षा घेण्यासाठी रसायनशास्त्र भौतिकशास्त्र, जीवशास्त्र व गणित विभागातर्फे परीक्षार्थीसाठी परभणीतील विविध महाविद्यालयातील प्रा. विष्णू नवपुते, प्रा. सतीश मुद्दे, प्रा. अरुण भांगे, प्रा. काशिनाथ सालमोटे, प्रा. तुळशीराम दळवे, प्रा. विशाल डाके, प्रा. मोहन गाडेकर, प्रा. सुषमा सोळुंके, प्रा. विना सदावतें, प्रा. नाकू पर्शिया, प्रा. दत्तात्रेय भड, प्रा. नितीनकुमार पारवे, वैभव राऊत, प्रा. शिवाजी पारवे, प्रा. संभाजी सवंडकर प्रा. शंकर ठोंबरे, प्रा. संजय ढवळे, प्रा. आशा रेंगे, प्रा जे. यु. पाटील, प्रा. संतोषी झरकर, प्रा. डी. एन. ढवळे, प्रा. प्रताप भोसले व श्री. प्रसाद वाघमारे यांनी परिश्रम घेतले. ◆

**– विज्ञान वार्ताहर**